# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २९/०१/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक २१/०२/२००६ रोजी सभा सुचना क्र. २६ दि. ०८/०२/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १०) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ११) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| १२) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १३) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १४) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १५) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, महानगरपालिकेचे अधिकारी वर्ग आणि महानगरपालिका कर्मचारी वर्ग. मी या ठिकाणी आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करतो. आपल्याला या ठिकाणी प्रशासनाने अंदाजपत्रक दिलेले आहे आणि आपण हे अंदाजपत्रक स्विकारायचे आहे. त्यासाठी खास करून ही सभा आयोजित केलेली आहे.

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन ०५-०६ च्या मूळ अंदाजपत्रकास स्थायी समितीपुढे जे बजेट ठेवण्यांत येणार आहे. त्या सभेला आपण सुरुवात करायची आहे. आलेल्या सर्व सन्मा. सदस्यांचे व प्रशासनाचे स्वागत आणि बजेटसाठी अंदाजपत्रक घेऊन आलेले मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त, सन्मा. आर. डी. शिंदे साहेब ह्यांचे आम्ही सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने स्वागत करतो आणि या मिरा भाईंदर शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून आपण जे बजेट सादर करणार आहोत. सभेला सुरुवात करण्याचे मी आदेश देत आहे. तत्पुर्वी मला असे बोलायचे आहे की, आयुक्त साहेब आपण वर्षातून एकदा येता. यापुढे किमान महिन्यातून एकदा तरी आमच्यापुढे आलात तर तुमचे मार्गदर्शन होईल आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेचे जे अंदाजपत्रक आपण देत आहात त्याचे इम्प्लीमेंन्टेशन करण्याला सर्व सन्मा. सदस्यांना सोयीचे आणि सुलभ होईल हा विश्वास मी आपल्या वतीने व्यक्त करतो आणि सचिवांनी सभेला सुरुवात करावी असे निर्देश देतो.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३८ चे वाचन केले.)

**मा. आयुक्त :-**

प्रथम या अंदाजपत्रकाची प्रत मी प्रशासनाच्या वतीने सन्मा. सभापतींना सादर करीत आहे.

(मा. आयुक्त सोा. ह्यांनी सभागृहात मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००४-०५ चे सुधारीत व सन २००५-०६ चे मुळ अंदाजपत्रक सभापतींना सादर केले.)

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सभापती, सर्व सन्मा. सदस्य व सदस्या, माझे सर्व सहकारी उपायुक्त व सचिव सोा, लेखाधिकारी व सर्व विभागप्रमुख आपले सर्वांचे मी प्रशासनाच्या वतीने आभार मानतो. आज २००४-०५ चा सुधारित व २००५-०६ चा अर्थसंकल्प आपल्यापुढे सादर करत असतांना मला अतिशय आनंद होत आहे. हे माझे तिसरे बजेट आपल्यासमोर येत आहे. कदाचित शेवटचे असेल. मागच्या दोन बजेटमध्ये आपण जे संकल्प केले होते त्यापैकी बहुतांश संकल्प आपण पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. जे काही अपुरे राहिले असतील ते अपुरेदेखील आपण या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करणार आहोत. थोडक्यात जे माझे निवेदन आहे ते मी आपल्यापुढे सादर करत आहे. या अर्थसंकल्पाच्या संदर्भातील ज्या उत्पन्नाच्या ठळक बाबी आहेत त्या पृष्ठ क्रमांक १ वर दिलेल्या आहेत. मालमत्ता कर चौतीस कोटी, जकात कर चाळीस कोटी, पाण्यावरील कर पंधरा कोटी, विशेष शिक्षण कर एक कोटी, विकास कर सात कोटी, बाजार फी दिड कोटी, नविन नळ जोडणी दोन कोटी, अग्निशमन सेवा कर साठ लाख आणि वृक्षकर एक कोटी एकवीस लक्ष. खर्चाच्या ज्या ठळक बाबी आहेत त्याच्यामध्ये नविन रस्ते अथवा डी.पी. रोड याच्यासाठी ५० कोटींची तरतुद केलेली आहे. भुयारी गटार योजनेसाठी आपण प्रतिकात्मक अशी तरतुद एक कोटी रुपयांची ठेवलेली आहे. भाईंदर पूर्व-पश्चिम सब-वेसाठी पाच कोटी रुपये ठेवले आहेत. घनकचरा व्यवस्थापनासाठी पाच कोटी ऐंशी लक्ष ठेवले आहेत. नविन जलवाहिनी टाकणेसाठी तीन कोटी रुपयांची तरतुद केलेली आहे. परिवहन सेवा आपली या वर्षापासून सुरु होत आहे. त्याच्यासाठीदेखील एक प्रतिकात्मक तरतुद म्हणून एक कोटी रुपये त्याच्यावर ठेवलेले आहेत. नविन गटारांसाठी सात कोटी रुपयांची तरतुद ठेवण्यांत आलेली आहे. संगणकीकरणासाठी दिड कोटी रुपये, नविन फायर फायटरच्या खरेदीसाठी एक कोटी रुपये, नविन हॉस्पीटलच्या संदर्भामध्ये ती ही तरतुद प्रतिकात्मक अशी ठेवलेली आहे. कमी जास्त खर्च, ज्यावेळेला आपणाला शासनाकडून जागा प्राप्त होईल त्यावेळी आपल्याला ते करता येईल. त्याकरिता पन्नास लाखाची तरतुद ठेवलेली आहे. वृक्षप्राधिकरणासाठी दिड कोटी रुपयांची तरतुद ठेवलेली आहे. ज्या प्रमुख बाबी आहेत त्याच्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज मार्गाचे काम हे जवळ जवळ जो कॅरेज-वे आहे तो पूर्ण होऊन आपण रहदारीसाठी खुला करुन घेतलेला आहे. वृक्षप्राधिकरणाच्या मार्फत कामे चालू आहेत आणि यंदाच्या साठी दिड कोटी तरतुद ठेवलेली आहे. तर ती आपल्यासमोर आहे. आरक्षणाचे रस्ते विकसित करण्याच्या बाबतीमध्ये मा. महासभेने जी मंजुरी दिलेली आहे आणि स्थायी समितीपुढे प्राधान्यक्रमाने जो मुद्दा आता विचाराधिन आहे. तर त्याच्यासाठी आपण कर्ज रक्कम प्राप्त करुन घेणार आहोत आणि त्यासाठी पन्नास कोटींची तरतुद महानगरपालिकेचा हिस्सा आणि कर्ज रुपाने अशी ठेवण्यांत आलेली आहे. अग्निशमन दलाच्या पुढील विकासासाठी एक कोटी पन्नास लाखाची तरतुद ठेवलेली आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी पाच कोटी ऐंशी लक्ष इतकी तरतुद ठेवण्यांत आलेली आहे. नागरी सुविधा केंद्र जे ३१/०१/२००५ ला आपण त्याच औपचारिक असे ओपनिंग करतो. त्याच्यासाठी पुढची जी तरतुद आहे प्रभाग समित्यांना जोडणे आणि इतर ज्या बाबी आहेत त्यासाठी दिड कोटी रुपयांची तरतुद ठेवलेली आहे. नगरसेवक स्वेच्छा निधी हा एक कोटी पंच्यान्नव लक्ष इतकी तरतुद केलेली आहे. दुर्बळ घटक आणि महिला बालकल्याण यांच्यासाठी बांधिल खर्च वजा जाता जे उत्पन्न शिल्लक राहते त्याच्यासाठी पाच टक्के इतकी रक्कम म्हणजे शहात्तर लक्ष रुपये ही प्रत्येकी तरतुद करण्यांत आलेली आहे. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीमध्ये महापालिका झाल्यानंतर अगोदर ८० टक्के रक्कम आपणांला अनुदानापोटी मिळत होती. परंतु, त्यानंतर शासनाने निर्णय घेतला की, ५० टक्के रक्कम अनुदान शासन देणार, वेतनाची आणि महागाई भत्याची. त्यामुळे ही रक्कम थोडीशी वाढलेली आहे आणि दोन कोटी दहा लक्ष इतक्या रक्कमेची तरतुद शिक्षण मंडळासाठी वेतनाकरिता करण्यांत आलेली आहे. सन २००५-०६ या आर्थिक वर्षामध्ये महापालिका क्षेत्राचा सर्वांगिण विकास करणे आणि जास्तीत जास्त नागरी सुविधा पुरवून लोकाभिमुख प्रशासन देण्याचा प्रयत्न हा प्रशासनामार्फत चालू असणार आहे आणि या अर्थसंकल्पाचे जे गोषवारा आहे हा साधारण पान क्र. २२ वर आपल्याला सादर करण्यांत आलेला आहे. याच्यामध्ये 'अ' 'ब' आणि 'क' अंदापत्रकाचे उत्पन्न आणि खर्च याचा गोषवारा सादर केलेला आहे. २०७,६८,४८,०००/- इतके आपले उत्पन्न अपेक्षित आहे. 'अ' अंदाजपत्रक, 'ब' अंदाजपत्रक आणि 'क' अंदाजपत्रकातून 'ब' अंदाजपत्रक म्हणजे परिवहन व्यवस्था आहे. परिवहन व्यवस्थेकडून कुठल्याही प्रकारचे उत्पन्न अपेक्षित नाही आणि त्यांचा अर्थसंकल्प हा वेगळा असणार आहे. खर्चामध्ये आपण एक कोटी रुपयांची तरतुद 'ब' अंदाजपत्रकामध्ये म्हणजे

परिवहन व्यवस्थेला देण्याचे आपण त्याला अनुदानच म्हणू. ते अनुदानच आहे. एक कोटी रुपयांची तरतुद केलेली आहे. अशा प्रकारे हे २०७,६८,४८,०००/- उत्पन्न आणि २०७,६८,४८,०००/- खर्च या अखेरच्या शिल्लकेसह एक लाख शहान्नव हजार इतकी शिल्लक ठेवून हे अंदाजपत्रक आपल्या चर्चेसाठी आणि मान्यतेसाठी सादर केलेले आहे. माझी सर्व सदस्यांना विनंती आहे की, यावरती सविस्तर चर्चा व्हावी आणि आपल्या शिफारशीनुसार मा. महासभेपुढे हा अर्थसंकल्प मंजुरीसाठी आपण सादर करावा. आपण सर्वजण या सादरीकरणासाठी उपस्थित राहिलात त्याबद्दल माझ्याकडून मी आपल्याला धन्यवाद देतो आणि माझे निवेदन संपवितो.

**रिटा शाह :-**

पहिल्यांदा कमिशनर साहेबांना धन्यवाद देते. त्यांनी एवढे उत्कृष्ट बजेट आमच्यासमोर ठेवले आहे आणि आपण शेवटचे जे बोललात तर मला असे वाटते आपल्यासारखा कमिशनर ह्या मिरा भाईंदर शहराला वर्षानुवर्षे भेटायला पाहिजे अशी माझी इच्छा आहे आणि माझी नाही तर सर्व सदस्यांची अशी इच्छा आहे. तर साहेब, आपण हा शब्द मागे घ्या की, मी हे शेवटचे बजेट पेश करतो आणि आपण आम्हांला जे बजेट सादर केले आहे त्याकरिता कॉंग्रेस पक्षातर्फे मी आपले हार्दिक अभिनंदन करते.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने, स्थायी समिती आजच्या ह्या सभेपुढे सन २००५-०६ या अर्थसंकल्पीय वर्षासाठी आपले आदरणीय कमिशनर साहेब, श्री. आर. डी. शिंदे साहेब ह्यांनी त्यांचे निवेदन असतांना ते बोलून गेले. परंतु, साहेब सतत तीन वर्ष स्थायी समितीला आणि महापालिकेला मा. महासभेला बजेट सादर करणे हे सुद्धा एक गौरवास्पद आहे. कारण तीन वर्षे लागोपाठ आपण सन २००३-०४, २००४-०५ आणि आता २००५-०६ चे सतत तीन वर्षे तुम्ही बजेट सादर केलेले आहे. अगदी भरपूर असा वेळ ह्याच्यावर सविस्तर चर्चा करण्यासाठी स्थायी समितीला मिळणार आहे. आपण आपल्या पुढच्या कामासाठी आऊट ऑफ स्टेशन जाणार असल्यामुळे हे बजेट अपेक्षेप्रमाणे थोडेसे पुढे आलेले आहे. तरीसुद्धा त्याच्यावर सखोल चर्चा करण्यासाठी प्रत्येक सदस्याला वाव मिळणार आहे. अजुनपर्यंत आम्ही डिटेल काही ह्याच्यात पाहिले नाही. परंतु, सर्वांगिण गोष्टीला आपण प्राधान्य दिलेले आहे. विशेष करुन मंजुर विकास योजनेचे जे डी.पी. रस्ते आहेत त्याला आपण प्राधान्याने न्याय दिलेला आहे. कारण शहराची लोकसंख्या भरमसाठ वाढलेली आहे. शहराची जी गरज झालेली आहे जे डी.पी. रस्ते आपल्याला प्राधान्याने डेव्हलप करायचे आहेत त्याला आपण विशेष करुन स्थान दिलेले आहे. सर्व स्थायी समिती सदस्यांच्या वतीने व सभापती श्री. मोहनजी पाटील ह्यांच्या वतीने आपणांस मी धन्यवाद व्यक्त करतो आणि पुढील कार्यासाठी आपल्याला शुभेच्छा देतो.

**गजानन भोईर :-**

सन २००४-०५ या वर्षाचे अंदाजपत्रक मा. आयुक्त साहेब यांनी आता जाहिर केलेले आहे. ते बोलतांना असे बोलले की, हे कदाचित शेवटचे असेल. पण आयुक्त साहेब, मी तुम्हांला सांगतो की, कुठलीही गोष्ट करतांना, श्लोक बोलतांना माणूस तीन वेळा बोलतो, कुठलीही विधी करतांना त्यांच्यावर पाणी किंवा दुध तीन वेळा आपण सोडतो. तीन आकडा शुभ आहे. नक्कीच तुम्हांला लाभदायक ठरेल अशी मी आशा बाळगतो आणि संपूर्ण मिरा भाईंदरवासियांतर्फे, आमच्या सदस्यांतर्फे, नगरसेवकांतर्फे मी आपल्याला धन्यवाद देतो.

**अशोक पाटील :-**

सन्मा. सभापती साहेब, वित्तीय वर्ष २००४-०५ चे सुधारित व २००५-०६ चे मुळ अंदाजपत्रक आज आयुक्त साहेब आर. डी. शिंदे यांनी आज आपल्या सभागृहासमोर सादर केलेले आहे. त्यांच्या कारकिर्दीतले हे लागोपाठ जवळ जवळ तिसरे बजेट आपणासमोर त्यांनी सादर केलेले आहे. अतिशय अभ्यासयुक्त असे हे बजेट असणार यात शंकाच नाही. गेल्या वर्षीच्या बजेटपेक्षा यावर्षी जवळ जवळ सुमारे २५ करोडची वाढ अपेक्षित आहे. याचाच अर्थ की, या शहराच्या उत्पन्नाच्या स्त्रोतमध्ये नक्कीच भर पडत चाललेली आहे. शिंदे साहेबांच्या आयुक्त पदाच्या कारकिर्दीमध्ये या शहाराचा इन्कम सोर्स नक्कीच वाढत आहे. या अनुषंगाने हे बजेट आता २०० कोटींच्या वर गेलेले आहे. शिंदे साहेब आपले अभिनंदन करतो, या शहराला चांगली सेवा पुरवल्याबद्दल आणि आपण जी खंत व्यक्त केली ती कदाचित शेवटचे. सर्व सदस्यांनी त्याबद्दल चिंता व्यक्त केली की, आपल्यासारखे कर्तव्यदक्ष आयुक्त साहेब आम्हांला यापुढे लाभावेत आणि पुढचेही बजेट आपल्या हस्ते आम्ही, कदाचित मी नसेन पण इतर सदस्य सभागृहात असतील आणि ते एक्सेप्ट करतील. आपल्या कारकिर्दीस शुभेच्छा देतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे तिसरे अंदाजपत्रक २००४-०५ चे सुधारित व २००५-०६ चे मुळ अंदाजपत्र हे आपल्याला मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन्मा. आयुक्त आर. डी. शिंदे साहेब ह्यांनी आपल्याला सादर केलेले आहे. सादरीकरणाचा या ठिकाणी जवळ जवळ कार्यक्रम झालेला आहे आणि त्याच्यावर सन्मा. सदस्यांनी आपल्याला त्याबद्दल धन्यवाद दिलेले आहेत आणि मी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सर्व सदस्यांच्या वतीने सांगू इच्छितो की, आपण दिलेले जे अंदाजपत्रक आहे. या अंदाजपत्रकामध्ये नक्कीच त्रुटी नसतील व त्रुटी नसताततही. परंतु, ह्याच्यामध्ये जो विकासाचा भार ह्या स्थायी समितीच्या सदस्यांवर असतो. त्यांनी विकास करण्याच्या दृष्टीकांनातून ज्या काही नविन भर टाकायच्या असतील, विकासाच्या दृष्टीकोनातून, विकास करणे कामी आणि असा विकास करत असतांना आपणांला लागणारा स्तोत्र, महसूल ह्यांच्यामध्ये सन्मा. सदस्य अतिशय सखोल आणि खेळीमेळीच्या वातावरणामध्ये ह्याचा अभ्यास करतील आणि अभ्यास करुन मुळात ह्याचे स्तोत्र वाढवून ह्या मिरा भाईंदरच्या अंदाजपत्रकामध्ये स्तोत्र आणि विकासाची भर ह्या दोन्ही गोष्टी एकत्र करुन एक चांगले बजेट, आम्ही सर्व स्थायी समिती सदस्य हे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आमसभेमध्ये ठेवून सर्व सन्मा. सदस्यांना, सर्वसाधारण सन्मा. सदस्यांना समर्थनपणे आपले बजेट हे त्यांच्यापुढे मांडू आणि मिरा भाईंदर शहराचा चांगला विकास करण्याच्या दृष्टीकोनातून सर्व कटीबद्ध राहू. हे बजेट ठेवतांना जे पहिले बजेट होते तेसुद्धा ठेवतांना मला सन्मा. सदस्यांनी चांगले सहकार्य केले होते आणि ह्यावेळी दुसऱ्यांदा बजेट ठेवण्याची संधी मला या ठिकाणी मिळालेली आहे आणि आयुक्त साहेब आपण माझ्या बरोबर आहात. ह्याच्या पुढचे बजेट या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे ठेवण्याच्या दृष्टीकोनातून आपला हातभार या शहराला आणि शहराच्या विकासाला लागेल. कारण आपण ज्या पद्धतीने उत्तरोत्तर प्रगती करत आलो, अंदाजपत्रकामध्ये आणि त्या त्या पद्धतीने या शहराचा जरुर तो विकास आपण केलेला आहे. कारण आज या शहरामध्ये अद्ययावत उड्डाणपूल आहे. शहरामध्ये अतिशय निकडीची बाब आणि अत्यंत गरजेची बाब पाणी. आज आपण सर्वांना शुध्द पाणी वेळेत देत आहोत. त्याच्यानंतर विविध विकासकामे शैक्षणिक दृष्टिकोनातून आपण पुढे आहोत. अशी अनेक कामे आपण ज्या अंदाजपत्रकामध्ये दर्शवलेली होती. त्यांचे जवळजवळ आपण इम्प्लीमेन्टेशन केलेले आहे आणि ह्या अंदाजपत्रकामध्ये नवीन परिवहन समिती आपण आणलेली आहे. मी अतिशय विश्वासाने सांगू इच्छितो की, माझ्या सन्माननीय सदस्यांच्या वतीने आणि सर्वसाधारण सभेच्या वतीने आपण नवीन एक उपक्रम म्हणून या ठिकाणी बेस्ट सेवा सुरु करु या आणि यासाठी लागणारे सहकार्य पुर्णपणे प्रशासनामार्फत शिंदे साहेब आपण कराल अशी आशा मी व्यक्त करतो आणि आपण आज या सभेपुढे येऊन जे अंदाजपत्रक स्थायी समितीला सुपूर्द केले त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो आणि ह्यावरही अंदाजपत्रक ठेवत असतांना ह्याच्यामध्ये काही बाबी आम्हाला लागतील त्याचे मार्गदर्शन आपण जरी प्रत्यक्षरित्या आलात नाही तरी आपल्या प्रशासनाच्या माध्यमातून आणि आता अत्याधुनिक जी सेवा भ्रमण दुरध्वनी सेवा आलेली आहे. त्यावरून आपल्याशी संपर्क साधून आम्ही आपली जरूर ती सुचना घेऊ आणि एक चांगले अंदाजपत्रक मा. महासभेपुढे ठेवू असे मी सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने सांगू इच्छितो आणि आपल्याला पुढील प्रवासासाठी शुभेच्छा देतो आणि चांगली कामगिरी करुन आपण हे बजेट चांगल्या पद्धतीने आम्हाला मार्गदर्शित कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि या मिरा भाईंदरच्या विकासासाठी आपले प्रशासन संपूर्णपणे सहकार्य मिळेल आणि स्थायी समिती सदस्यांचे स्वागत करून आजचे जे अंदाजपत्रक दिलेले आहे ते आम्ही स्विकारलेले आहे असे मी घोषित करतो. धन्यवाद!

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने, कमिशनर साहेबांनी आपल्याला बजेट सादर केलेले आहे. वादच नाही. चर्चेला कुठे वाव नाही. तरीपण एक सुचना आपणांला ते पुढे करायचीच आहे. पण सभापती साहेबांच्या माध्यमातूनच ते होणार आहे. तरीसुद्धा एक आगाऊ सुचना म्हणा, गेल्यावर्षी मिरा रोडची जी पावसाळ्यात परिस्थिती होती, संपूर्ण मिरा रोड पाण्यात बुडालेले होते आणि दरवर्षीच अशी परिस्थिती असते. मिरा रोडमध्ये सखोल भाग असल्यामुळे येणाऱ्या बजेटमध्ये मिरारोडसाठी स्पेशली आता तुम्ही तशी तरतुद केलेली आहे. भुयारी गटारे, साधी गटारे आहेत. तरी मिरा रोडच्या निधीमध्ये वाढ व्हावी म्हणजे त्यांचा तो प्रश्न कायम स्वरुपी निकाली निघण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये रात्री मुझफ्फर हुसेन साहेबांचा फोन होता आणि वैती साहेबांचाही फोन होता. या परिसरासाठी अशी वेगळी तरतुद करण्यांत यावी. तर आम्ही त्यांना सांगितले की, नविन गटारे आणि भूमिगत गटारे अशी व्यवस्था जरी आपण केली असली तरी आपण चर्चेनंतर मिरा रोड परिसराला प्राधान्य देवुन तशी जर आपल्याला व्यवस्था करायची असेल तर नक्की आपल्याला तसे करता येईल.

**रिटा शाह :-**

भाईंदर पूर्व आणि पश्चिम जास्त डेव्हलप एरिया आहे. गटार आहेत. पाणी निचऱ्याचा वे देखील आहे. मिरा रोड प्रत्यक्ष बघितले तर मिरा रोडला कुठेही पाणी निचऱ्याची जागा नाही आणि त्यांना प्रायोरिटी द्यायची व त्याच्यासाठी वेगळे बजेट आपण फिक्स करायला पाहिजे. कारण आपण कॉमन बजेट ठेवले तर त्याच्या प्रायोरिटीवर परत वादावाद होणार. म्हणून मिरा रोडसाठी वेगळे बजेट ठेवायलाच पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

भुयारी गटारासाठी आपण एक कोटी रुपये ठेवलेले आहेत आणि नविन गटाराच्या बांधणीसाठी सात कोटी रुपये ठेवले आहेत. अर्थसंकल्पाचे मुळात तत्वच असे आहे की, अमर्यादित गरजा आहेत आणि मर्यादित साधने आहेत. ह्याचा मेळ घालण्याच्या दृष्टीने आपल्याला जे शक्य आहे, आपल्या गरजा अनंत आहेत, ज्याला आपण प्राथमिक गरजा म्हणू. आपले लोकांच्या जिवीताच्या दृष्टीने हे करणे आवश्यक आहे. अशा गोष्टीला आपल्याला प्राधान्य दिलेच पाहिजे. तर त्या दृष्टीने विचार करायला हरकत नाही आणि भुमिगत गटारामध्ये जी एक कोटी रुपयांची तरतुद आहे, ती आणि ही सात कोटीची, ह्याच्या संदर्भात आपण चर्चा करुन जो निर्णय घ्याल त्यानुसार त्याला प्राधान्य देण्यांत येईल.

**अशोक पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, शिक्षण क्षेत्रामध्ये आपण ज्या शाळांच्या बाबतीत जो भाडे प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता आणि तीन वर्षे आपण त्याचा पाठपुरावा करतोय. त्याचा अजुन काही पाठपुरावा झाला का?

**मा. आयुक्त :-**

पाठपुरावा आपण सगळ्या पातळीवर करतोय. परंतु आपणाला ही माहिती आहे, शासनाची आर्थिक स्थिती , आपल्याला पाठीमागचे भाडे द्यावे इतकी स्ट्राँग नाही. जवळपास तीन एक कोटी रुपये मागची थकबाकी आहे. आपले प्रयत्न चालू आहेत. परंतु, शासनाच्या आर्थिक स्थितीचा आपल्याला विचार करण्याची आवश्यकता आहे. ते पैसे येतील. परंतु पाठपुरावा चालू आहे.

**अशोक पाटील :-**

पालकमंत्री आता आपले आहेत. त्यांच्या माध्यमातून सभापती महोदय तुम्ही पाठपुरावा केला तर शासनाकडून आपल्याला निदान चार कोटींतून दोन कोटी आले असते.

**मा. आयुक्त :-**

आपली सुचना चांगली आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, आपण सभागृहाच्या वतीने तुम्ही पालकमंत्री ह्यांच्याकडे पाठपुरावा करावा.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतोय. साहेब आता तुम्ही जे बजेट सादर केले आहे त्याच्यात ५ नंबरचे जे पान आहे, त्याच्यामध्ये नगरसेवक मानधन, महापौर अतिथी, परिवहन सेवा ह्याच्यामध्ये मिस्टेक काय झालेली आहे? का आपण काय केलेलेच नाही. तर हे जे झिरो झिरो जे आहे ते कदाचित........

**शरद बेलवटे :-**

त्याची तरतुद पान क्र. १८ वर दिलेली आहे.

**मिलन पाटील :-**

आयुक्त साहेब, आपण मागच्या वेळेला म्हणजे नगरपालिकेच्या वेळेला आपण शाळेकरिता अनुदान देत होतो.

**मा. आयुक्त :-**

आपण चर्चेमध्ये काय निर्णय घ्याल तसे करु.

**मिलन पाटील :-**

आपण देऊ शकतो ना? आम्ही जर सुचवले तर आपण करु शकता?

**मा. आयुक्त :-**

आपण चर्चा करुन द्या.

**मिलन पाटील :-**

पण ह्याच्यात आहे ना?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी आणि सर्व सन्मा. स्थायी समिती सदस्य आपणांला प्रशासनाकडून जे बजेट आलेले आहे ह्या बजेटमध्ये मघाशी मी मुद्दामहून असा उल्लेख केला, त्रुटींचा. कारण ज्या पद्धतीने सखोल अभ्यास करुन आपल्याला हे बजेट आलेले आहे आणि जरी सखोल अभ्यास केल्यानंतर मला विश्वास आहे की, स्थायी समिती सदस्य प्रशासनाच्या उपरही सखोल अभ्यास करु शकतात. हा माझा विश्वास आहे आणि म्हणून आपण हे बजेट प्रशासनाने आपल्याला सादर केलेले आहे. त्याच्यानंतर ह्याची जी मॅरेथॉन चर्चा ह्या बजेटवर आहे त्या मॅरेथॉन चर्चेमध्ये आपण प्रत्येक हेडखाली त्याच्यात जी खर्चाची बाजू आणि जमेची बाजू आहे ह्याच्यावर पूर्णपणे विचार करण्याचे स्वतंत्रपणे अधिकार आपल्या सन्मा. सदस्यांना आहे.

**मा. आयुक्त :-**

नागरिकांच्या ज्या गरजा आहेत त्या प्रशासनापेक्षा तुम्हांला जास्त माहित असतात.

**मा. सभापती :-**

म्हणून त्याच्यावर चर्चा करुन ज्या हेडखाली पैसे कमी आहेत ही गोष्ट व्हायला पाहिजे. त्याच्याकरिता सन्मा. सदस्यांनी मते मांडली. महत्वाचा मुद्दा मांडला की, मिरा रोडसाठी आपल्याला वेगळे बजेट नाही. त्याच्याकरिता आपल्याला तरतुद हवी आहे. ती तरतुद ही आपण ठेवू शकतो. कोणत्या स्त्रोतने पैसे मिळवू शकतो, आपण कोणत्या पद्धतीची तरतुद ठेवू शकतो ते सर्व आपल्या हातामध्ये आहे. याकरिता सन्मा. सचिवजी दोन तारखेच्या नंतर आपणांला जवळजवळ तीन दिवस या बजेटवर चर्चा करायची आहे. अभ्यास पूर्ण करायचा आहे त्या पद्धतीची माहिती, निमंत्रण आम्ही आपल्याला देवू आणि त्यावेळी आपण ह्या बजेटमध्ये जी संकल्पना त्याचा आपण अभ्यास पूर्णपणे करा. बजेटची प्रत आपल्याकडे असेल.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, सात दिवसांची मुदत द्या, अभ्यास करण्यासाठी. त्याच्यानंतर तीन दिवस लागोपाठ तुम्ही मॅरेथॉन चर्चा घ्या.

**मा. सभापती :-**

शिंदे साहेब बाहेर आहेत आणि आपल्याला या वर्षाच्या कालावधीमध्ये जो अडीच वर्षाचा कालावधी आपला आहे. तर सन्मा. महापौर मायरा मेंन्डोंसाजी ह्यांचा कार्यकाल बघता त्यांच्या कार्यकालामध्ये आपल्याला बजेट या ठिकाणी ठेवायचे आहे. त्याकरिता प्रशासनाने अतिशय अभ्यासपुर्वक कोणताही वेळ न घालवता त्यांनी आपल्या प्रशासनाच्या विविध विभागीय अधिकाऱ्यांना बोलावून त्यांनी ज्या पद्धतीने हे बजेट आपल्यासमोर आणले. कारण शेवटी ह्याचे इम्प्लीमेंन्टेशन आहे ते आपल्याला मार्च महिन्याच्या नंतर करायचे आहे. पण त्याच्यावर असा विचार केला की, सन्मा. महापौर ह्यांच्या कारकिर्दीमध्ये आपल्याला हे बजेट ठेवता आले पाहिजे. त्या दृष्टीकोनातून आपल्याला उद्यापासून किंवा २ तारखेपासून ३ तारखेपर्यंत आपल्या हातात बजेट राहील आणि ३ तारखेनंतर आपण जे दोन-तीन दिवस बसू. कारण आपण तीन दिवस अभ्यास करणार आहोत.

**अशोक पाटील :-**

दोनशे करोडचे बजेट आहे आणि तीन दिवसात सर्व सन्मा. सदस्यांना त्याचा अभ्यास होणार नाही. आपण सात दिवसांची मुदत द्या. त्याच्यानंतर आपण तीन दिवस मॅरेथॉन सभा घ्या. हरकत नाही. मा. महापौरांच्या कारकिर्दीमध्ये होऊ शकेल.

**रिटा शाह :-**

शेवटी मा. महापौरांच्या कारकिर्दीचेच हे काम आहे ना! आम्ही ते मान्य करतो. पण तुम्ही सात दिवसांची वेळ द्या.

**मा. सभापती :-**

ठिक आहे, किमान वेळ घेऊन आपण त्या पद्धतीचा अभ्यास करु.

**प्र. सचिव :-**

मा. सभापतींच्या परवानगीने, आपली जी महासभा असते ती २० तारखेपर्यंत असते आणि १९ व २० तारखेला सुट्टी आहे आणि २० तारखेनंतर पुढच्या मा. महापौरांच्या निवडणुकीचा प्रोग्राम लागू होईल. २१-२२ तारखेपासून कधीही लागू होईल. आम्हांला त्याकरिता सात दिवस पाहिजे. त्यामुळे २८ तारीख ही निवडणुकीची शेवटची तारीख असेल. ही जर बजेटची सभा लावायची असेल तर ती १८ तारखेपुर्वी लावावी लागेल. जर लावायची असेल तर. आपल्या ज्या सुचना असतील त्या प्रिंटींगने गृहित धरु या.

**मा. सभापती :-**

आपल्याला ह्याच्यात मुळ अडचण अशी राहणार आहे की, बजेट आपण मंजुर करु. पण त्याच्यानंतर ते प्रिंटींग झाले पाहिजे.

**अशोक पाटील :-**

प्रिंटींगला किती कालावधी लागणार आहे? तर दोन दिवस. दोन दिवसांत प्रिंटींग होऊ शकते.

**रिटा शाह :-**

साहेब, आता संगणकाचे फास्ट युग आहे. संपूर्ण आपली मिरा भाईंदर महानगरपालिका कम्प्युटराईज झाली आणि आपण असे हॅन्डवर्क मॅनपावर वापरणार तर ती गोष्ट चालणार नाही.

**अशोक पाटील :-**

दोन दिवसांत प्रिंट होते.

**रिटा शाह :-**

दोन दिवसांत प्रिंट होते. जर होत नसेल तर बाहेरच्या लोकांकडून करुन घ्या.

**अशोक पाटील :-**

१८ ला आपण मा. महासभा ठेवू शकता. १८ ही शेवटची तारीख आहे.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. सर्व सन्मा. सदस्यांच्या आलेल्या सुचनांचा जरुर विचार करुन आपण जी किमान वेळ अपेक्षित ठेवू त्या वेळेप्रमाणे आपण या अंदाजपत्रकाची सभा लावू व त्याच्यावर आपण मॅरेथॉन चर्चा करुन चांगले बजेट आपण संपादन करु. या ठिकाणी आपण आयुक्त साहेबांना ही काही सुचना सन्मा. सदस्यांनी सांगितल्या आणि त्या सुचनांचा जरुर त्यांनी विचारही केलेला आहे. मी सर्व सन्मा. सदस्यांचे आभार व्यक्त करतो व त्यांना धन्यवाद देतो आणि आलेले सन्मा. आयुक्त साहेब, माझी आपल्याला अशी एक नम्र विनंती आहे की, किमान चार सभा ह्या महिन्याला होत असतात. माझी अशी सुचना आहे व विनंती आहे, सर्व सन्मा. सदस्यांच्या वतीने की, किमान महिन्याला दोन पाहिजे पण एकतरी सभा आपण द्यावी. जेणेकरुन आपल्याला एका महिन्याचा आढावा घेता येईल आणि आपल्या चांगल्या सुचनाही आमच्यापुढे येतील आणि ज्या कायदेशीर बाबी आहेत त्याच्यावरसुद्धा आम्हांला चांगले सहकार्य लाभेल अशी इच्छा व्यक्त करतो.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदयांनी जी सुचना मांडली ती योग्यच सुचना मांडली आणि आयुक्त साहेब आम्ही सर्वांच्या वतीने निवेदन करतो, जे ठराव आम्ही स्थायी समितमार्फत करतो त्याचे खरोखर इम्प्लीमेंन्टेशन होते की नाही ह्याचा आढावा घेण्यासाठी तुम्ही किमान एक सभा आम्हांला द्यावी. आमची अशी खंत आहे की, आम्ही केलेल्या ठरावाची अंमलबजावणी तंतोतंत केली जात नाही. काही ठराव तसेच पडून आहेत याची गांभिर्याने दखल घ्या.

**मा. आयुक्त :-**

मी फक्त प्रशासनातर्फे धन्यवाद देतो. आपण सर्व या ठिकाणी आलात आणि या सादरीकरणामध्ये आपण सहभाग घेतला. गेल्या दोन बजेटमध्ये आपण त्याच्या अंमलबजावणीमध्ये मला जे सहकार्य दिलेले आहे त्याबद्दलही मी आपल्या सर्वांचा ऋणी आहे. पुन्हा एकदा आभार मानून सभापती महोदयांच्या वतीने हा सादरीकरणाचा कार्यक्रम संपलेला आहे असे मी जाहिर करतो.

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपण सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. २.४५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका